# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२३-२३** **दिनांक :- १३/०४/२०२३**

## १६० ग्रॅम वजनाचा ३२,००,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या परकीय नायजेरीयन आरोपीतावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नालासोपारा (पुर्व) परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या परकीय नायजेरीयन ईसमांविरुध्द माहिती प्राप्त करुन कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी मार्गदर्शन व आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने दिनांक १२/०४/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. अमर मराठे व स्टाफ हे नालासोपारा परिसरात गस्त करीत असताना प्रगतीनगर हायटेन्शन रोड, श्री. गुरु अपार्टमेंट जवळ रोडलगत, नालासोपारा (पुर्व) या ठिकाणी आले असता एक परकीय नायजेरीन ईसम हा संशयास्पद स्थितीत उभा असल्याने त्यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता तो पो.हवा. टक्के व पो.अंम.यादव यांना प्रतिकार करुन धक्काबुक्की करुन पळुन जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलीस पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव इबे इवे ऊर्फ चिमा मोजेस, वय ३७ वर्षे असे सांगितले. सदर इसमाची दोन पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कब्ज्यात १६० ग्रॅम वजनाचा ३२,००,०००/-रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगला असताना मिळुन आला असुन सदर अंमली पदार्थ पुढील कारवाई कामी जप्त करण्यात आला आहे. वर नमुद अरोपीताविरुध्द पो.अंम. यादव यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. ॥ ३१२/२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क) सह भा.दं.वि.सं. कलम ३५३, ३२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे करीत आहे.

वर नमुद अटक अरोपीतावर यापुर्वी मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता कब्ज्यात बाळगलेबाबत विरार, तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा दाखल असुन मुंबई शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सायबर पोलीस ठाणेत माहिती व तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पो.नि. श्री.

अमर मराठे, स.पो.नि. अमोल आंबवणे, विलास कुटे, पो.हवा. इंगळे,टक्के, पाटील, आव्हाड, घरबुडे, सपकाळ, म.पो.हवा. एक्कलदेवी  व पो.अंम. यादव यांनी केली आहे.



------oooo------